आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १८४ वा ● शनिवार दि. २१ डिसेंबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## झरोका

एक – अहो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अवामान केला परंतु त्यानंतर नेते केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी, गेले कुण्या गावा, नाही मला ठावा, मला कोणीतरी सांगा, तो ठाव कसा, उडतो डोळा, बाई डोळा, मी काय करू आठवले विना आठवतच नाही, मग बाबासाहेब आंबेडकरांचे काय अशीच चर्चा सर्वत्र होताना दिसते आहे, त्यामुळे यातील गौड्बंगाल काय असावे हेच कळत नाही, डोकं बधिर झालाय.

दुसरा – अरे, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय समाज कल्याण मंत्री रामदास आठवले हे लोकशाहीवादी आहेत, भारतीय सत्ताकारणात अग्रेसर असताना महापुरुषाच्या नावासंदर्भात जो काही गदारोळ होतो ते शांत करण्याचेच काम त्यांचे असते, खरे खोटे काय ते पाहण्याची गरज नसते कारण सत्तास्थापन केल्यानंतर आपापली खुर्ची सांभाळणे हेच त्यांचे कर्तव्य असते, त्यामुळे आठवले काय, केंद्रीय मंत्री रामदास आठवले काय, त्यांचा खुर्चीसाठी ना ईलाज झाला असल्यामुळे ते आज घडीला व्हिजन वासात गेले असावे अशी शंका निर्माण होते आहे, त्यात तुला काय पडलंय.

एक – अहो, काँग्रेसचे मल्लिकार्जुन खरगे खासदार वर्षा गायकवाड, शिवसेनेचे उद्धव ठाकरे, राष्ट्रवादीचे शरद पवार, काँग्रेसचे प्रियंका गांधी, राहुल गांधी हे सारे तुटून पडलेले असताना त्यात तृनमल काँग्रेसच्या, ममता बॅनर्जी असो या साऱ्या अमित शहा यांच्यावर तुटून पडले असताना आंबेडकरी चळवळीतील ढाण्या वाघ बनवून वावरलेले रामदास आठवले एक शब्दही उच्चारत नाहीत, यातील गौडबंगाल का असावे म्हणून विचारतो आहे.

दुसरा – अरे, समाजकारण राजकारण ही एक बाजू असते परंतु सत्ताकारणात बेरजेचे राजकारण करावे लागत असल्यामुळे सत्तापद टिकवायचे असेल तर सत्ता प्रमुखाच्या विरोधात जाता येत नाही आणि विरोधात गेलो तर खुर्ची राहत नाही म्हणून रामदास आठवले हे चुडी चुपीचा कांगावा करून ते कुठेतरी रममान झाले असतील किंवा आजाराचे सोंग घेऊन कुण्या दवाखान्यात दाखल झाले असतील त्यामुळे त्यांच्या कृती वरती बद्दल संशय घेणे चुकीचे वाटते.

एक – अहो, रामदास आठवले हे शासकीय कार्यक्रमात उपस्थित असताना सामाजिक न्यायाच्या संदर्भात बोलण्यापेक्षा मोदीचे गुणगान करून काव्यात्मक भाषण करीत असतात. न चुकता ते शासकीय कार्यक्रमात उपस्थित राहतात परंतु केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केला असताना रामदास आठवले गप्प कसे अशीच शंका निर्माण झाल्यामुळे मणा मध्ये पाल चुकचुकती आहे, त्याचे काय.

दुसरा – अरे, जोपर्यंत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, अमित शहा वर कारवाई करीत नाहीत, अमित शहा राजीनामा देत नाहीत, बाबासाहेब आंबेडकरांचा, जनतेची माफी मागत नाहीत आणि ज्यावेळी अमित शहा गुजरातच्या घरात जाऊन बसल्याशिवाय रामदास आठवले प्रसारमाध्यमासमोर येणार नाहीत ही काळ्या दगडावरची रेघ आहे. कारण भारतीय राजकारणात, समाजकारणात, सत्ताकारणात रामदास आठवले हेच एकमेव आंबेडकरवादी असल्याची यांचीच खात्री असल्यामुळे त्यामुळे अदृश्य होऊन जगतील, राग, रंग ते पहात असावेत ते सारे मोदी, शहा यांना अवगत असेल त्यामुळे चर्चा नको.




## देवकिसन सारडा यांच्या निधनाने सेवाव्रती उद्योगपती गमावला

नागपूर : दैनिक 'देशदूत'चे संस्थापक आणि प्रख्यात उद्योजक देवकिसन सारडा यांच्या निधनाने सेवाव्रती उद्योगपती आपण गमावला आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली वाहिली आहे.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस आपल्या शोकसंदेशात म्हणतात, श्री. सारडा यांचे नाशिक शहर, जिल्हा आणि महाराष्ट्राच्या औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रांतील योगदान मोठे आहे. विविध संस्थांची निर्मिती करताना त्यांनी मूल्य जोपासण्यावर भर दिला. त्यांनी 'देशदूत', 'सार्वमत' वृत्तपत्रांची स्थापना करून लोकभावनेला आणि लोकप्रश्नांना व्यासपीठ मिळवून दिले. त्यांनी १९५९ मध्ये श्री सिन्नर व्यापारी बँकेची स्थापना करून सहकार क्षेत्रात पदार्पण केले. नाशिक, अहमदनगर, सोलापूर व बुलढाणा जिल्ह्यांतील नागरी सहकारी बँका सुरू होण्यास त्यांचा हातभार लागला आहे. सहकार चळवळ वाढविण्यात आणि रूजविण्यात त्यांनी दिलेले योगदान कायम स्मरणात राहील. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.

## मुंबईतील मनोरा आमदार निवास इमारतीच्या कामाला गती देऊन जानेवारी २०२७ पर्यंत बांधकाम पूर्ण करण्याचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचे निर्देश

नागपूर, : विधिमंडळ अधिवेशनासह मंत्रालयातील विविध कामांसाठी मुंबईत येणाऱ्या आमदारांसाठी निवासाची व्यवस्था होण्याकरिता उभारण्यात येत असलेल्या मनोरा आमदार निवास इमारतीच्या बांधकामाला गती देऊन ते जानेवारी २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वे कर यांनी उच्चाधिकार समितीच्या बैठकीत दिले.



मुंबई येथील मनोरा आमदार निवास प्रस्तावित पुनर्विकास प्रकल्पाचा आढावा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार मनोरा आमदार निवासाच्या बांधकाम आराखड्यात बदल करण्यात येत आहे. त्यामुळे हरित पट्टा, वाहनतळ, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प यासारख्या सुविधांचे ठिकाण आणि क्षेत्र यामध्ये बदल झाला आहे. या पार्श्र्वभूमीवर कामाच्या स्वरुपात झालेला बदल आणि त्याच्या वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली. मनोरा इमारतीच्या बांधकामाचा वेग वाढवून ठरलेल्या वेळेच्या आता सर्व कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात यावीत, असे निर्देशही अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले.

या बैठकीस विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विधानमंडळ सचिव जितेंद्र भोळे, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेशकुमार, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्रिवनी भिडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते, लार्सन अँड टुब्रो कंपनीचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी लार्सन अँड टुब्रो कंपनीतर्फे सादरीकरण करण्यात आले.

## नगरविकास, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या २०२४-२५ वर्षाच्या पुरवणी मागण्या विधानसभेत मंजूर

मुंबई, :- नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या २०२४-२०२५ या वर्षासाठीच्या ३ हजार ४६२ कोटी १७ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांना विधानसभेत मंजुरी देण्यात आली. त्यामध्ये नगर विकास विभागाच्या २ हजार ७७४ कोटी ४३ लाख आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या ६८७ कोटी ७४ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देतांना सांगितले की, पुरवणी मागण्यांवरील चर्चेत ३४ सदस्यांनी सहभाग घेतला. या सदस्यांनी मांडलेल्या प्रश्र्नांना संबंधित मंत्र्यांच्या माध्यमातून लेखी उत्तरे दिली जातील, असेही उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, पुरवणी मागणीवरील चर्चेत काही सदस्यांनी महानगरपालिका नगरपालिकांच्या अखत्यारीत असलेले प्रश्र्न उपस्थित केले. हे प्रश्र्न मार्गी लावण्यासाठी संबंधित यंत्रणेला सूचना देण्यात येतील. तसेच नागरिकांच्या दृष्टिकोनातून सदस्यांनी उपस्थित केलेले सर्व प्रश्र्न सोडविले जातील.

या खेरीज सामान्य प्रशासन, गृह, महसूल व वन, शालेय शिक्षण व क्रीडा, वित्त, जलसंपदा, विधी व न्याय, ग्राम विकास, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, नियोजन, गृहनिर्माण, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य, आदिवासी, सहकार पणन व वस्त्रोद्योग, उच्च व तंत्रशिक्षण, महिला व बालकल्याण विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता, कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य, इतर मागास बहुजन कल्याण, मृद व जलसंधारण आणि दिव्यांग कल्याण विभागाच्या पुरवणी मागण्याही विधानसभेत मंजूर करण्यात आल्या.

## महाड स्फोटाच्या प्रकरणाची गंभीरता वाढली; जखमींचा आकडा ९ वर

महाड : महाड औद्योगिक वसाहतीच्या अतिरिक्त क्षेत्रांमधील एसटेक लाईफ सायन्स कंपनीत काल (दि. १९.१२.२०२४) रोजी दुपारच्या सुमारास भीषण स्फोट झाला. ह्या स्फोटाच्या प्रकरणाची गंभीरता वाढली असून जखमींचा आकडा ९ वर पोहोचल्याची माहिती पोलिसांकडून प्राप्त झाली आहे.

दरम्यान एमआयडीसी पोलीस ठाण्याने कंपनी प्रशासनाच्या ९ प्रमुख अधिकारांच्या विरोधात गुन्हा दाखल केल्याची माहिती देखील हाती आली आहे. महाड अतिरिक्त औद्योगिक क्षेत्र परिसरातील काळीज गावच्या हद्दीतील एसटेक लाईफ सायन्स लिमिटेड या रासायनिक कारखान्यामध्ये काल तीन च्या सुमारास अचानक एका रसायन असलेल्या टाकीमधून मोठ्या प्रमाणात आवाज येऊन टाकीचा भीषण स्फोट झाला.

या स्फोटाची तीव्रता एवढी होती की, त्याचा आवाज परिसरातील तीन किलोमीटर पर्यंत पसरला. या स्फोटाच्या तीव्रतेने उडालेले प्लांटचे पत्रे व लोखंडी तुकडे या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांना लागून ते जखमी झाले.

## बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी भोकर मध्ये निषेध सकल मराठा बांधवांच्या वतीने विविध मागण्यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

भोकर – बीड जिल्ह्यातील आदर्श सरपंच संतोष



देशमुख यांच्या हत्तेची सीआयडी मार्फत चौकशी करून मारेकऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्यात यावी. यासह विविध मागण्यांचे निवेदन दिनांक १९ डिसेंबर रोजी भोकर येथील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले.

राज्यातील बीड जिल्ह्या मधील मस्साजोग गावचे युवा लोकनियुक्त सरपंच संतोष देशमुख यांचे दिनांक ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण करून त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. सरपंच संतोष देशमुख त्यांची हत्या करणाऱ्या मारेकऱ्यांना व मुख्य सूत्रधारासह सर्व गुन्हेगारांना तत्काळ अटक करून सदर प्रकरणातील आरोपींना पाठीशी घालून जिल्ह्यात दहशत निर्माण करणाऱ्या राजकीय नेत्यांना सरकारने पाठीशी न घालता सदरील गुन्ह्याचा तपास आयडी मार्फत करून सदरील प्रकरण जलद गती न्यायालयात चालवून सदरील पीडित कुटुंबीयांना तत्काळ न्याय मिळवून द्यावे. घटनेचे प्रत्यक्षदर्शी शिवराज देशमुख यांना प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत पोलीस संरक्षण द्यावे.

जिल्ह्यात हौदोस घालणाऱ्या गुंड प्रवृत्ती असणाऱ्या लोकांना असणाऱ्या राजकीय नेते पदाधिकाऱ्यांचे सीडीआर तपास करण्यात यावे. सदरील हत्याकांडाची सखोल चौकशी करून दोशींवर कडक शासन करण्यासाठी विशेष तपास यंत्रणा एस आय टी नेमण्यात यावी आदींसह विविध मागण्यांचे निवेदन भोकर येथील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने भोकर तहसीलदार यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले आहे.

निवेदनावर आनंद पाटील शिंदीकर, बालाजी पाटील कदम, शिवाजी पाटील माने, सुनील पाटील, दिगांबर देशमुख, जितेंद्र पाटील सावंत सायाळकर, पुंडलिक भोसले, केशव पाटील सोळंके पोमनाळकर, बापूराव मांजरे सायाळकर, शिवाजी कदम आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७० फुट ऊंचीचा पुतळा, विलासराव देशमुख मार्ग दुसरा टप्पासाठी निधी उपलब्ध करुन दयावा आमदार अमित देशमुख यांची विधानसभेत मागणी

**महिलांसाठी मोफत सिटी बस प्रवास, नाट्यगृह, शादीखाना, शिवछत्रपती ग्रंथालय, मराठी भाषा भवन यासाठीही निधीची मागणी**

नागपूर ( प्रतिनिधी) : शुक्रवार २० डिंसेबर २४

लातूर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे स्टॅच्यू ऑफ नॉलेज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७० फुट उंचीच्या पुतळा उभारणी तसेच शिवछत्रपती वाचनालय इमारतीची पुर्नबांधणी, हुतात्मा स्मारक व मराठावाडा मुक्ती स्मारक स्तंभ परीसराचे सुशोभिकरण, आदरणीय विलासराव देशमुख मार्गाचा दुसरा टप्पा यासह विविध प्रकल्पासाठी त्वरीत निधी उपलब्ध करुन दयावा, त्याच बरोबर, कृषी महाविद्यालयाच्या जागेवर लातूर जिल्हा रुग्णालय व विलासराव देशमुख शासकीय वैदयकीय महाविदयालयाच्या वतीने पटेल चौक येथे उभारावयाच्या मदर न्ड चाइल्ड रुग्णालयाच्या जागेचा प्रश्र्न त्वरीत सोडवावा, अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी विधानसभेत केली.

नागपूर येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान आज नगर विकास व सार्वजनीक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्यावरील चर्चेत सहभागी होताना लातूर शहरासह व राज्यातील महत्वाकांक्षी प्रकल्पा बाबत माजी मंत्री आमदार देशमुख यांनी आपली भुमिका




मांडून मागणी नोंदवली.

विधीमंडळाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान शुक्रवारी विधानसभेत पुरवणी मागण्यावरील चर्चेत सहभागी होतांना आमदार अमित देशमुख म्हणाले की, महिलांसाठी सिटीबस मधून मोफत प्रवास योजना सुरू करणारी लातूर ही राज्यातील पहीली मनपा आहे. ही योजना पूढे सुरू राहण्यासाठी राज्य शासनाने लातूर मनपाला पुरेसा निधी उपलब्ध करुन दयावा. एसटी प्रवासात महीलांना सवलतीची योजना लागू केलेली आहे त्या धर्तीवर राज्यातील सर्व महानगरात महीलांना सिटीबस मधून मोफत प्रवास योजना लागू करावी.

लातूर शहरात उभारण्यात येणाऱ्या स्टॅच्यू ऑफ नॉलेज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७० फुट उंचीच्या पुतळा उभारणीसाठी व परिसर विकासासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करून द्यावा. लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय महाविद्यालयाच्या वतीने लातूर शहरातील पटेल चौक येथे उभारावयाच्या मदर अँड चाइल्ड रुग्णालयासाठी नगर विकास विभागाची जागा प्रति एक रुपया चौरस मीटर एवढ्या नाममात्र भाड्याने उपलब्ध करून द्यावी. लातूर शहरातील मुख्य रस्त्याला समांतर पद्धतीने बांधण्यात येत असलेल्या विलासराव देशमुख मार्गाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. लातूर शहरात उभारण्यात येत असलेल्या नाट्यगृह बांधकामासाठीचा उर्वरित निधी उपलब्ध करून द्यावा. लातूर शहरात मनपाच्या वतीने एका शादीखानाचे बांधकाम पूर्ण केले आहे. दुसऱ्या शादीखानाचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत आहे, त्या शादीखाना इमारतीसाठी आवश्यक असणारा निधी त्वरित उपलब्ध करून द्यावा. लातूर शहरात मनपाच्या वतीने मागच्या अनेक वर्षापासून शिवछत्रपती ग्रंथालय चालवण्यात येत आहे, आता या ग्रंथालयाची इमारत जुनी झाली असून त्या इमारतीची अदययावत पध्दतीने उभारणी आवश्यक झाली आहे, त्यामुळे शासनाच्या वतीने राज्यभरात प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी मराठी भाषा भवन उभारण्यात येणार आहे, त्यासाठीही लातूर येथे निधी उपलब्ध करून देण्यात यावा आदी मागण्याही यावेळी आमदार देशमुख यांनी केल्या.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## काय बोलता राव ?

महाराष्ट्र हा थांबणार नाही, सर्वांगीण विकास करणार नाही, जनतेचे प्रश्न सोडविणार नाही लोकशाही जिवंत ठेवणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही, असे उद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे, काय अशीच कुजबुज होताना दिसते आहे, यातील काय भानगड आहे.

**काय बोलता राव !**

अरे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार हप्ते खोरीला थारा नाही. म्हणूनच पवारांचे आठ तास, फडणवीस यांची २४ तास, शिंदेचे रात्री बारा ते आठ पर्यंतचे कार्यकाळासंदर्भात जी माहिती दिली त्यातून जे काही त्यांना सांगायचे आहे त्यातून सर्व काही स्पष्ट होत असताना तो काय उलटा समजून लोकांसमोर येत आहेस, त्यामुळे सर्वसामान्यांची दिशाभूल होत आहे कारण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांचेच जुळले नाही तर विकासाबद्दल काय अपेक्षा कराव्यात त्यामुळे महाराष्ट्राच थांबणार नाही हे गप्पा लोकांना. मग बोला दाजीबा.

## लोकशाहीत भाटशाही कशी ?

### संपादकीय...

स्वातंत्र्यपूर्व काळापासून हिंदुत्ववादी लोकांनी दिन दलितांचा छळ केला, उपेक्षितांची मानहानी केली, दलित सुवर्ण मराठा, अल्पसंख्यांक वगैरे वगैरे च्या नावाखाली म्हणून संस्कृतीच्या भाटशाहीने जानवेधारी संस्कृतीने भारतावर कहर केला होता, मनू नावाच्या एकाने मनु संस्कृती रुजवली आणि त्यातूनच हिंदू धर्माचे रडगराने सुरू झाले, आणि त्यातूनच दलित सुवर्ण जाती, भेद, उच्च, नीच, स्पर्श, अस्पर्श अशी भेदभावाची जातीय उतरंड निर्माण केली गेली. त्याही वेळी भारतीय स्वातंत्र्यासाठी काँग्रेसने अहोरात्र प्रयत्न केले, त्याही काळात बाबासाहेबांना अवमानित जीवन जगावे लागत होते तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवतेच्या दृष्टिकोनातून भारताला मानवी संस्कृती आणि माणुसकी यासह सामाजिक न्याय हक्क धर्मनिरपेक्ष विचाराची भारतीय राज्यघटना दिली त्यावरच आज देशभराचा कारभार चालतो आहे, परंतु लोकशाहीच्या नावाखाली भाटशाही राबविणारे लोकप्रतिनिधी आज सत्ताकारण कसे काय करतात अशीच विचारणा सर्वसामान्य जनतेकडून प्रसार माध्यमांना होताना दिसते आहे.

लोकसभेमध्ये संविधानावर चर्चा होत असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भात जे काही विचार व्यक्त केले ते अवमानवी होते तरीही लोकशाही संसदेचा आणि संविधानाचा मान राखून विरोधी पक्षांनी केवळ अमित शहा यांनी असे काय उद्गार केले त्यांनी देशाची जाहीर माफी मागावी आणि लोकशाहीवादी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या पेकाडात लाथ मारून त्यांना पदमुक्त करावे अशी नाईक मागणी असताना भाजपा सह राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी आणि खासदारांनी उलट काँग्रेसवरच आरोप करून जे काय उलटापालट करीत आहेत ते अशोभनीय वाटते कारण असे की डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे शिल्पकार आहेत, भारतीय राज्यघटना ही बाबासाहेबांची देण आहे, त्यामुळेच पागल आदिलाबादी अमित शहा यांनी बाबासाहेबांच्या संदर्भात जे काही विधान केले त्यामुळे गदारोळ सुरू असताना राष्ट्रीय स्वंयसेवक संघ आणि भाजपा मात्र अमित शहा यांची पाठराखण करीत असताना दिसत आहेत ही बाब लोकशाही संविधानाला घातक ठरते.

विचाराच्या अमित शहा यांनी बाबत बाबासाहेबांच्या संदर्भात जे काही विचार केले त्या संदर्भात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, शिवराज सिंह, चव्हाण, भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा हे सारे केवळ कातडी बचाव च्या निमित्ताने अमित शहा यांच्या बाजूने उभे राहून लोकशाही संविधानाला छेद देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराला आणि त्यांचे व्यक्तिमत्व आणि त्यांच्या ध्येयधोरणाला काळीमा फासणारे कृतीला साथ देताना दिसतात परंतु शहाच्या बाजूने जे कोणी राष्ट्रीय स्वंयसेवक संघ असो भाजपाचे लोकप्रतिनीधी, खासदार, मंत्री असो त्यांनी काही केले तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आंबेडकराच आहेत, भारताचा बुलंद आवाज म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेतले जाते, भारत हा लोकशाही प्रधान देश झाला सामाजिक न्याय आणि मानवी हक्काचा हक्कदार झाला त्यामुळेच भारताचे नावलौकिकता जगभरात आहे त्याचे कारण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत.परंतु अमित शहा यांच्यासारख्या नालायक माणसाने एकेरी शब्दात आंबेडकर म्हणून आंबेडकरांच्या नावाने गाजावाजा करणारे लोक हे आंबेडकर नावाची फॅशन करतात, असा उद्गार अमित शहा यांनी केला परंतु अमित शहा यांना भारत स्वतंत्र झाला आहे त्यावेळी पंतप्रधान पंडित नेहरू, सरदार वल्लभाई पटेल, लालबहादूर शास्त्री आणि तत्कालीन राष्ट्रपती जग जगभरात भारतातील संविधान लिहिण्यासाठी भिकारी म्हणून फिरत होते, त्यावेळी परदेशातील एका व्यक्तीने तुम्ही भिकाऱ्यासारखे कसे फिरतात, भारतीय संविधान लिहिणारा हिरा भारतात आहे, त्यावेळी महात्मा गांधी यांनी त्यांचे नाव काय आहे ते सांगा, मी त्यांच्याशी बोलतो त्यावेळी परदेशी सत्ताधाऱ्याने डॉ. बी आर आंबेडकर असे नाव सांगताच स्वतंत्र भारताचे लोकप्रतिनिधी मान खाली घातले आणि त्यावेळी संविधान निर्मितीचे सदस्य, अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड झाली आणि त्या समितीत जे कोणी होते ते अमित शहा यांच्या दृष्टीने स्वर्गात गेले, कोणी नरकात गेले, कोणी परदेशात गेले, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीच संविधान लिहिले हा इतिहास भाडखोर अमित शहा यांना माहीत नसावा काय, ही बाब प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शहाच्या लक्षात का आणून देऊ नये आणि मग आज घडीला लोकशाहीत भाटशाही निर्माण करून भाजपा काँग्रेसचा कांगावा कितीही झाला तरी आंबेडकरी जनता फिनिक्स बणून खडतर उत्तर देईल यात संधी नसावा हे सत्ताधारी विरोधक आणि लक्षात ठेवावे एवढेच.

## जय श्री माताजी दि.२१ डिसेंबर हा जागतीक ध्यान दिवस म्हणुन संपुर्ण जगाने मान्यता दिलेला दिवस

लातूर : दि.२१/१२/२०२४ रोजी संपुर्ण विश्र्वात विश्र्व निर्मल धर्म सहजयोगाच्या वतीने ध्यान दिवस म्हणुन साजरा केला जात आहे.प.पु.श्री आदिशक्ती श्री माताजी श्री निर्मला देवीजींच्या परम् कृपेने संपुर्ण जगाला मीळालेला आशिर्वाद म्हणजेच सहजयोग साधना आहे. ही साधना नियमित करनारा मनुष्यं आतुन शांत,समाधानी,सुखी,निरोगी व आनंदी होऊन तो स्वतहाच्या परिवाराला व विश्र्वातील मानवालाही शांत,सुखी,समाधानी निरोगी व आनंदी व्हायला मदत करु शकतो.

आज संपुर्ण विश्र्व धगधगत्या ज्वालामुखीच्या तोंडावर येऊन बसलेय. कुठल्याही क्षणी त्याचा स्फोट होऊन विश्र्वाचा विनाश होईल हे कोणीही सांगु शकत नाही व नाकारुही शकत नाही. श्री.प.पुजनिय तथागत भगवान गौतम बुद्धांनी शांतीचा संदेश देऊन मानवाला सुखी होन्याचा मंत्र दिला. तो मंत्र महामानव,भारतरत्न,विश्र्वरत्न डॉ.श्री,श्री,श्री बाबासाहेब आंबेडकरजी यांनी वेळीच ओळखुन त्यांनी श्री भगवान बुध्दांचा मार्ग स्विकारुन संविधानाच्या माध्यमातुन आखिल मानव जातीला एक होऊन सुखा, समाधानाने भेद रहित शांततेत जगन्यासाठी समता, विश्र्वबंधुता, व आखिल सजीवाविषयी दया, क्षमा, करुणा, शुध्दता, पावित्र्यं अर्थात शिलवान होन्यासाठी देशाला व विश्र्वाला संविधान रुपी आमृत दिले. जे आज आपण सहज पणे चाखत आहोत.

शास्त्रात सांगीतलेय की पिंडी ते ब्रम्हांडी. अर्थात बहुसंख्य मानव जर स्वैर, निती, अनितीचा भेद न करता काहीही करुन पैसा, सत्ता हस्तगत करुन मनमानी पध्दतीने भ्रष्टाचार, व्यभिचार, व्यसने, अन्याय, अत्याचार व स्वत:च्या स्वार्थासाठी कुठल्याही थराला जाऊन फक्त विलासी जीवन जगन्यासाठीच झगडतो आहे. सुसंस्कार, पावित्र्य, परोपकार, दया, क्षमा, शांती यावर बहुसंख्य लोकांचा विश्र्वास राहिलेला नाही. अशा लोकांची संख्या आधिक झाल्याने त्याचा परिणाम म्हणुन आज भुमंडळ, ब्रम्हांड व अनंतकोटी ब्रम्हांड ही असंतुलित होऊन पृथ्वीमातेवर त्याचा परिणाम होऊन पृथ्विमातेचे तारुण्यं संपत चाललेले असुन पृथ्वीमाता निराश होऊन झपाट्याने वार्धक्याला जवळ करत आहे.पृथ्वीवरील लोकांच्या पिंडाचा समस्त ब्रम्हांडासी संबंध आसल्याने हे सर्व घडत आहे. पिंड अर्थात स्वभाव. लोकांचे जसे स्वभाव तसे ब्रम्हाण्ड होते.

या सर्वाला बदलुन विश्र्वातील जास्तीत जास्त मानवजातीला त्याची श्री कुंडलिनी शक्ती जागृत करुन आत्मज्ञान, आत्मसाक्षात्कार देऊन सहजसाधनेने सांगीतल्या प्रमाणे दररोज नियमित एक ही दिवस खाडा न पडु देता भक्ती, व विश्र्वासाने सहज ध्यान केल्याने एक दिवस तो सहजसाधक जीव आसे पर्यंतच श्री माताजींच्या कृपेत श्री परमेश्र्वराला प्राप्त होतो. व शेवटी मोक्षाला प्राप्त होऊन त्याला श्री परमेश्र्वरी प्रेमाचे सिंहासन प्राप्त होऊन आखेर त्या सिंहासनाची सत्ता आगाध शांतीच्या आवकाशावर व श्री परमेश्र्वरी प्रेमाच्या सागरावर चालते. व पृथ्वीमातेला गत तारुण्यं व गतवैभव, गतऐश्र्वर्य प्राप्त होऊन विश्र्वशांती, विश्र्वबंधुत्व, विश्र्वप्रेम, सर्वांभुती दया, क्षमा, शांती आनंद, ऊत्तमारोग्यं व दिर्घायुष्यं लाभुन भुमंडळातील संतुलन ठिक होऊन सगळीकडे आनंदी, आनंद, निर्भयता, समता, करुणा, व शील अर्थात पवित्रता प्रस्थापित होऊन मानव जीवन व आखिल जीवसृष्टी सुखी होते. जगातील चारशे देशापेक्षा आधिक देशात लोक श्री माताजींच्या कृपेने सहजयोग पध्दतीने ध्यान साधना करित आहे. दि.२०/१२/२०२४ रोजी सकाळी दहा वाजता शेकडो सहजयोगी युवाशक्ती, ताई, दादांनी श्री माताजींची प्रतिमा स्थापण चैतन्य रथा सोबत मोटार सायकल रॅली भगवे फेटे बांधुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क ते हनुमान चौक, गुळ मार्केट, श्री महात्मा बसवराज चौक, श्री राजीव गांधी चौक, श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, अंबेजोगाई रोड ने रेणापुर नाका व परत श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, व डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे येवुन रॅलिचे विसर्जन केले. ऊद्या दि.२१/१२/२०२४ रोजी सकाळी दहा वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क मैदानावर लातुर महानगरपालिकेचे सन्माननिय आयुक्त श्री बाबासाहेब मनोहरे सर यांचे हस्ते सकाळी १०:३० वाजता दिप प्रज्वलन करुन दिवसभर रात्री ७:०० वाजेपर्यंत येनाऱ्या लोकांना श्री माताजींच्या कृपेत श्री कुंडलिनीची जागृती व आत्मसाक्षात्काराच्या प्राप्तीची अनुभुती देण्याचे परम् पवित्रं ईश्र्वरी कार्य होणार आहे. लातुर शहर व परिसरातील सर्व जाती, धर्मातील, सर्व पंथातील लोकांना येथे विनामुल्य, निशुल्क प्रवेश आहे.

## शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले पाहिजे !!

राष्ट्रीय शेतकरी दिवस हा हिंदीमध्ये 'किसान दिवस' म्हणूनही ओळखला जातो. हा दिवस भारताचे पाचवे पंतप्रधान श्री चौधरी चरणसिंग यांच्या जयंती स्मरणार्थ देखील साजरा केला जातो. 'शेतकरी दिन' हा शेतकरी आणि शेती यांच्या राष्ट्रीय योगदानाचा उत्सव साजरा करण्यासाठी विविध देशांमध्ये वार्षिक साजरा केला जातो. हे जगभरात वेगवेगळ्या तारखांना पाळले जाते. पहिला शेतकरी दिन २००१ मध्ये साजरा करण्यात आला. त्यावेळी दहाव्या सरकारने चौधरी चरणसिंग यांचे कृषी क्षेत्रातील योगदान आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी त्यांची जयंती 'किसान दिवस' म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेतला. तेव्हापासून भारतातील दरवर्षी २३ डिसेंबर रोजी हा दिवस 'राष्ट्रीय शेतकरी दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी विविध कार्यक्रम, वादविवाद, परिसंवाद, प्रश्र्नमंजुषा स्पर्धा, चर्चा, कार्यशाळा, प्रदर्शने, निबंध लेखन स्पर्धा आणि कार्ये आयोजित करून तो साजरा केला जातो.

चरणसिंह यांचा जन्म १९०२ मध्ये उत्तर प्रदेशातील मेरठ जिल्ह्यातील नूरपूर येथे एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात झाला. त्यांनी आग्रा विद्यापीठातून १९२३ मध्ये विज्ञान विषयात पदवी आणि १९२५ मध्ये पदव्युत्तर पदवी मिळवली. कायद्याचे प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांनी गाझियाबादमध्ये कायद्याचा सराव सुरू केला आणि १९२९ मध्ये ते मेरठला गेले. ते पहिल्यांदा १९३७ मध्ये छपरौली येथून यूपी विधानसभेवर निवडून आले आणि १९४६, १९५२, १९६२ आणि १९६७ मध्ये त्यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. १९४६ मध्ये पंडित गोविंद बल्लभ पंत यांच्या सरकारमध्ये ते संसदीय सचिव झाले आणि महसूल, वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य, न्याय, माहिती इत्यादी विविध खात्यांमध्ये त्यांनी काम केले. जून १९५१ मध्ये त्यांची राज्यात कॅबिनेट मंत्री म्हणून निवड करण्यात आली आणि त्यांच्याकडे न्याय आणि माहिती खात्यांचा कार्यभार देण्यात आला. पुढे त्यांनी १९५२ मध्ये डॉ. संपूर्णानंद यांच्या मंत्रिमंडळात महसूल आणि कृषी मंत्रीपद भूषवले. एप्रिल १९५९ मध्ये त्यांनी राजीनामा दिला तेव्हा ते महसूल आणि परिवहन खात्याची जबाबदारी सांभाळत होते. १९६० मध्ये श्री सी.बी. गुप्ता यांच्या मंत्रालयात ते गृह आणि कृषी मंत्री होते. १९६२-६३ मध्ये चरणसिंग यांनी श्रीमती सुचेता कृपलानी यांच्या मंत्रालयात कृषी आणि वनमंत्री म्हणून काम केले. त्या दशकात पंजाब आणि हरियाणामध्ये विकसित झालेल्या हरितक्रांतीने देशाचे कृषी चित्र बदलले. यामुळे उत्पादकता वाढली आणि त्यामुळे भारत विविध कृषी मालामध्ये स्वयंपूर्ण झाला.१९६५ मध्ये त्यांनी कृषी विभाग सोडला आणि १९६६ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा पदभार स्वीकारला. चौधरी चरणसिंह यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्रीपद भूषवलं होतं. यादरम्यान त्यांनी अनेक महत्त्वाची कामं केली. त्यांच्यामुळेच आज शेतकरी खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला. त्यांनी जमीनदारी रद्द केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी लेखापद पद बनवलं. त्यानंतर ते उपपंतप्रधान बनले आणि मग २८ जुलै १९७९ ते १४ जानेवारी १९८० पर्यंत त्यांनी अत्यंत अल्प कालावधीसाठी पंतप्रधानपदी विराजमान होऊन पंतप्रधान म्हणून देशाची सेवा केली.

चरणसिंह यांनी उत्तर प्रदेशमध्ये विविध पदांवर काम केले आणि प्रशासनातील अकार्यक्षमता, घराणेशाही आणि भ्रष्टाचार सहन न करणारे कठोर कार्यकारी म्हणून नाव कमावले. एक हुशार संसदपटू आणि व्यावहारिक माणूस चरणसिंग हे त्यांच्या वक्तृत्व आणि विश्र्वासासाठी ओळखले जातात. ते उत्तर प्रदेशातील जमीन सुधारणांचे मुख्य शिल्पकार होते; ग्रामीण कर्जदारांना मोठा दिलासा देणारे विभाग विमोचन विधेयक १९३९ तयार करण्यात आणि अंतिम करण्यात त्यांनी प्रमुख भूमिका बजावली. मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी जमीनधारणा कायदा १९६० आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, ज्याचा उद्देश जमीनधारणेची कमाल मर्यादा कमी करणे आणि राज्यभर एकसमान करणे हे होते. एक समर्पित सार्वजनिक कार्यकर्ते आणि सामाजिक न्यायावर दृढ विश्र्वास ठेवणारे चरणसिंग यांचे सामर्थ्य मुळात लाखो शेतकऱ्यांच्या विश्र्वासातून निर्माण झाले. भारत हा मुख्यत: खेड्यांचा देश आहे आणि खेड्यांमध्ये राहणारी बहुसंख्य लोकसंख्या शेतकरी आहे आणि शेती हा त्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. अजूनही ७०% भारतीय लोकसंख्या शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून आहे.

चौधरी चरणसिंह यांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध धोरणांनी भारतातील सर्व शेतकऱ्यांना जमीनदार आणि धनदांडग्यांच्या विरोधात एकत्र केले. भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेल्या 'जय जवान जय किसान' या प्रसिद्ध घोषणेचे त्यांनी पालन केले. ते एक अतिशय यशस्वी लेखक होते आणि त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली ज्यात शेतकरी आणि त्यांच्या समस्यांबद्दल त्यांचे विचार मांडले गेले. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांनी विविध उपायांच्या स्वरूपात खूप प्रयत्न केले. त्यांनी साधे जीवन व्यतीत केले आणि आपला मोकळा वेळ वाचन आणि लेखनात घालवला. त्यांनी 'जमीनदारीचे निर्मूलन', 'सहकारी शेतीचा क्ष-किरण', 'भारताची गरिबी आणि त्याचे निराकरण', 'शेतकऱ्यांची मालकी किंवा मजुरांसाठी जमीन' आणि 'खालील जमीन ताब्यात घेणे' यासह 'एक निश्र्चित किमान खाली विभाजनास प्रतिबंध' असे अनेक पुस्तके लिहिल्या. शेतकरी हा भारताचा कणा आहे. चौधरी चरणसिंग अत्यंत साध्या मनाचे व अत्यंत साधे जीवन जगणारे शेतकरी नेते होते, ज्यांनी भारतीय शेतकऱ्यांचे जीवन सुधारण्यासाठी अनेक धोरणे आणली. ते शेतकरी कुटुंबातील होते आणि त्यामुळे भारताचे पंतप्रधान असूनही त्यांनी अतिशय साधे जीवन जगले. आपल्या जीवनातील शेतकऱ्यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी आणि त्याची कबुली देण्यासाठी 'राष्ट्रीय शेतकरी दिन' साजरा केला जातो. सर्वांना शेतकरी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई-मेल : ीीींळपलरसवशसारळश्र.लो

## एसटी प्रवास भाड्यात १४.९५ टक्के वाढ करून प्रवाशांवर जास्तीचा बोजा लादु नका.

सरकारने एसटी प्रवास भाडे कमी करण्यापेक्षा भरमसाठ वाढ करीत आहे ही बाब सर्वसामान्य प्रवाशांना न झेपणारी आहे. प्रवासभाड्यात १ किंवा २ टक्के वाढ कोणीही मान्य करू शकते व सहन करू शकते.परंतु प्रवाशांना सुविधा देण्याच्या नावाखाली परिवहन महामंडळ जर १४.९५ टक्के प्रवास भाडे वाढ करीत असेल तर ही बाब सर्वसामान्यांच्या प्रती अत्यंत चिंताजनक बाब आहे.कारण सरकारने अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे स्वागतच. परंतु प्रवाशांच्या सुविधांच्या नावाखाली सर्वसामान्यांची दिशाभूल करू नये.

प्रवाशांना किंवा नागरिकांना सुविधा देणे हे प्रत्येक सरकारचे कर्तव्य असते.त्यापध्दतीने सरकारला नियोजन सुध्दा करावे लागते ही बाब सत्य आहे.परंतु सरकार जर अचानक १४.९५ टक्के एवढी भरमसाठ वाढ करीत असेल तर असे म्हणायला हरकत नाही की सरकारने लागू केलेल्या अनेक योजनांची वसुली तर करीत नाही ना! अशी शंका सर्वसामान्यांच्या मनात येईल.कारण प्रवाशांच्या सुविधांसाठी १ किंवा २ टक्के प्रवास भाडे वाढ ठीक आहे.यातुन महामंडळ चांगल्याप्रकारे सुविधा उपलब्ध करु शकते.त्यामुळे सरकारने व राज्य परिवहन महामंडळाने १४.९५ टक्के प्रवास भाडे यावर गांभीर्याने विचार करावा.कारण सरकार जेव्हा अनेक सुविधा नागरिकांना प्रदान करतात.तेव्हा त्याचा प्रथम विचार करायला हवा.अचानक जर आपण अवाढव्य भाडेवाढ करण्याचा विचार केला तर अनेकांची बोटे महामंडळ व सरकारवर उठतील. त्यामुळे सरकारने व राज्य परिवहन महामंडळाने भाडे वाढीचे गांभीर्य लक्षात घेतले पाहिजे.एसटी महामंडळाच्या प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यासाठी नव्या वर्षात ३५०० नव्या बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार आहे ही आनंदाची बाब आहे व याचे स्वागतच.कारण राज्यात प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

त्यामुळे १४.९५ टक्के भाडे वाढ ही बाब बरोबर नाही. राज्यात एसटी महामंडळाच्या १४ हजार बसेस धावतात यात ३५०० नवीन बसेस येतील यामुळे प्रवाशांना सुविधा उपलब्ध अवश्य होईल यात दुमत नाही.परंतु प्रवास भाड्यात १४.९५ टक्के वाढ करून याचा संपूर्ण भुर्दंड प्रवाशांवर लादु नये. शासनाने आपला खर्च कमी करावा, सरकारच्या अनेक कारवाईच्या मार्फत सरकारी तिजोरीत मोठ्या प्रमाणात काळा पैसा आलेला आहे त्याचा वापर यासाठी करावा, त्याचप्रकारे अनेक प्रकारचे कर जमा होतात त्यातून प्रवाशांना सुविधा उपलब्ध करून द्यावी व प्रवाशांकडून हातभार म्हणून १ किंवा २ टक्के प्रवास भाडे वाढ करून सुविधा उपलब्ध करून द्यावी.

यामुळे सरकार व प्रवासी यांच्यात समतोल राहील. राज्यातील अनेक बसस्थानकांचा चेहरामोहरा बदलणार ही आनंदाची बाब आहे याचे स्वागतच.परंतु सरकार जेव्हा अनेक योजना राबविते तेव्हा सरकारजवळ आपोआप पैसे येतो आणि जेव्हा प्रवाशांना सुविधा देण्याचा निर्णय सरकार घेते तेव्हा सरकार प्रवाशांजवळुन १४ .९५ टक्के भाडे वाढ करून सुविधा देण्याची गोष्ट करते हे योग्य नाही.एसटी प्रवाशांना सुविधा अवश्य द्या परंतु अवाढव्य भाडेवाढ करून नाही तर समतोल राखुन.

प्रवाशांना एसटी प्रवासात सवलत द्यायची सोडून सुविधांच्या नावाखाली भरमसाठ वाढ करून गरीब प्रवासी, शेतकरी, सर्वसामान्यांना सरकार लुटते की काय अशी शंका सर्वसामान्यांच्या मनात निर्माण होत आहे.सरकारला व महामंडळाला एसटी प्रवाशांना खरोखरच सुविधा द्यायची असेल तर एखाद्या योजनेअंतर्गत द्यावी व एक किंवा दोन टक्के भाडेवाढ करून सरकारने प्रवाशांकडून मदत घ्यावी व एसटीचा आणि बसस्थानकाचा चेहरामोहरा बदलवावा आणि संपूर्ण महाराष्ट्रात एसटी महामंडळाने आपले आगळेवेगळे स्थापन प्रस्थापित करावे.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## लातूर-टेंभुर्णी च्या चौपदरीकरणासाठी ५७४ कोटी निधी मंजूर; केंद्रीय मंत्री गडकरी यांचे आ. कराड यानी मानले आभार



लातूर - गेल्या अनेक वर्षापासून रखडलेल्या लातूर-टेंभुर्णी या रस्त्याच्या कामाचे केंद्र शासनाच्या वतीने वेगवेगळे टप्पे मंजूर करण्यात येत आहेत. त्यानुसार या रस्त्यावरील ३७ किलोमीटर अंतराच्या चौपदरीकरण महामार्गासाठी ५७४ कोटींचा निधी केंद्रीय रस्ते वाहतूक विकास मंत्री ना. नितीनजी गडकरी यांनी मंजूर केला आहे. सदरील निधी मंजूर करून रस्त्याच्या कामाला गती दिल्याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार रमेश आप्पा कराड यांनी त्यांचे मनः पूर्वक आभार व्यक्त केले आहेत.

पुणे - मुंबईकडे जाणारा लातूर ते टेंभुर्णी हा महामार्ग गेल्या अनेक वर्षापासून रखडला होता. लातूरकरांसाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असल्याने या रस्त्याच्या कामाला निधी मिळावा यासाठी वेळोवेळी केंद्रीय रस्ते विकास मंत्री मा. नितीनजी गडकरी यांची भेट घेऊन आ रमेशआप्पा कराड यांनी आग्रहाची मागणी केली होती. सदरील रस्ता वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याने या रस्त्याच्या कामाला टप्प्याटप्प्याने निधीची तरतूद करून कामाला गती देण्यात येत आहे.

लातूर - टेंभुर्णी या महामार्ग-६३ वरील जावळे-बोरगाव काळे दरम्यानच्या ३७.५२५ किलोमीटर मार्गाच्या पेव्हड शोल्डरसहित ४-लेन पुनर्वसन आणि अपग्रेडेशनसाठी ५७४.१८ कोटी रुपयांसह मंजुरी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे.

राज्यातील प्रमुख शहरांना जोडण्यांसाठी हा मार्ग महत्त्वाचा आहे. तसेच कृषी मालाची वाहतूक आणि व्यावसायिकांसाठी देखील हा मार्ग महत्त्वपूर्ण आहे. सदरच्या महामार्गाला तब्बल ५७४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून कामाला गती दिल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांचे लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहे.

ऐन वेळी ..
खमंग मस्त विषय
अधिवेशनाचे वेळी
सापडे कसे नेमके
कुणाची बुवाखेळी
खुशीमध्ये विरोधक
गालांवर पडे खळी
इतकेदिवस लपली
आता फुलते कळी
सत्ताधारी गटांमध्ये
चालू होई गुपचिळी
कुणाची बने बकरी
बळी तो कानपिळी
रोखून बसली कशी
बंदूक बाईची नळी
प्रकरण फार तापते
देऊन टाकावा बळी
ऐकणार नाही मुळी
तप्त विरोधक फळी
काही करे अटकळी
माजवू टाक दुफळी
एका हाताने वाजते
सांगाकधी हो टाळी
संशय भरतो मनात
कोण कुणा कंटाळी

बळी ..
आपले सारले बाजू
परक्यांना कवटाळी
सत्ता धारी हातावरी
विरोधक देती टाळी
रे गरम दिसला तवा
भाजून घेतलीपोळी
नको नको म्हणेतो
ओसंडून वाहे झोळी
करत आहे करामती
नवीन आलेलीटोळी
संशय भरतो मनात
कोण कुणा कंटाळी
समस्यांच्या तोंडांत
कोंबा अफूची गोळी
पहा मदतीला आली
नव्या दमाची फळी
समोरच्या विभागात
माजवू टाका दुफळी
एकाची फौज समक्ष
रे दुसरी सेना दुबळी
युध्द देवतेला देतात
बकरे जातात बळी
त्रिकालावादी रे सत्य
बळी तोचंकानपिळी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६..**

# बांबू लागवडीतून शेतकऱ्यांना पूरक व्यवसाय होईल- मुख्यमंत्री

नागपूर –बांबू लागवड अभियानातून शेतकऱ्यांना पूरक व्यवसाय उपलब्ध करण्याबरोबरच जंगल क्षेत्रामध्ये वाढीसाठी विविध उपाययोजना राबविण्यात याव्यात. त्यासाठी रोपवाटिकांमध्ये बांबू रोपे उपलब्ध करून द्यावीत. मराठवाड्यातील पडीक जमिनीवर मोठ्या प्रमाणात बांबूची लागवड करून जंगल क्षेत्रामध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करावा. राज्यातील महत्त्वाकांक्षी अभियानांना गती देण्यासाठी मुख्य सचिवांनी प्रमाणित प्रक्रिया (एसओपी) ठरवून द्यावी. अभियानाचा कालावधी, संबंधितांच्या जबाबदाऱ्या याबाबत स्पष्टता ठेवावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

राज्याच्या सर्वांगीण, सर्वसमावेशक आणि गतिमान विकासासाठी 'महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉरमेशन'च्या (चखढठ– 'मित्रा') माध्यमातून आरोग्य, ग्रामीण रस्ते वाहतूक, कौशल्य विकास आणि बांबू प्रकल्प या क्षेत्रांवर भर देण्यात आला आहे. या प्रकल्पांची गती वाढविण्यासाठी राज्यात सुरु असलेल्या आणि प्रस्तावित असलेल्या प्रकल्पांना आशियाई विकास बँकेने (–उङ) मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बँकेला केले आहे. 'एडीबी'च्या संचालक मिओ ओका यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर विधानभवन परिसरातील मंत्रिमंडळ सभागृहात आशियाई विकास बँक संदर्भातील विविध विषयांबाबत बैठक झाली

या बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, 'एडीबी'च्या संचालक मिओ ओका, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, नियोजन–महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, ग्रामविकास प्रधान सचिव एकनाथ डवले, वने विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, पर्यावरणचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव सचिव श्रीकर परदेशी यांच्यासह 'एडीबी'चे विविध विषय तज्ज्ञ उपस्थित होते.

# ग्राहकांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे आवश्यक - अमोल गिराम

लातूर, : ग्राहक हा राजा आहे, असे म्हटले जाते. प्रत्येक नागरिक हा जन्मापासून ते मृत्यूपर्यंत ग्राहकच असतो. त्यांची फसवणूक होवू नये, यासाठी त्यांना ग्राहक संरक्षण कायद्यानुसार मिळालेल्या हक्कांची जाणीव करून देणे आवश्यक आहे, असे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष अमोल गिरमे यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयात जागतिक ग्राहक दिनानिमित्त जिल्हा पुरवठा विभागाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके होते.

ग्राहक संरक्षण कायद्याविषयी जनजागृती



जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या सदस्य वैशाली बोराडे, विधिज्ञ ॲड. अनिल जवळकर, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष दत्ता मिरकले पाटील, प्रांत ग्राहक संरक्षण परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश भोसले, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य प्रल्हाद तिवारी, शिवशंकर रायवाडे, बालासाहेब शिंदे, विपुल शेंडगे, शामसुंदर मानधना, इस्माईल शेख, संगमेश्र्वर रासुरे, मंजुषा ढेपे, व्यंकट कुलकर्णी, सतीष देशमुख, रंजना मालुसरे, एन. जी. माळी, गीता मोरे, नितीन कल्याणी, अभिजित औटे यावेळी उपस्थित होते.

ग्राहक संरक्षण कायद्याविषयी जनजागृती होण्यासाठी जागतिक ग्राहक दिनानिमित्त करण्यात आलेले उपक्रम कौतुकास्पद आहेत. या उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना कायद्याची माहिती मिळेल, तसेच आपली फसवणूक झाली तर काय केले पाहिजे, याबाबत जाणीव जागृती होण्यास मदत होईल. सध्या ई–कॉमर्स संकेतस्थळावरून ऑनलाईन शॉपिंगचे प्रमाण वाढले आहे. या माध्यमातूनही ग्राहकांची फसवणूक होवू शकते. त्यामुळे ग्राहकांनी याबाबत अधिक सजग होणे गरजेचे आहे. एखादी वस्तू ऑनलाईन स्वरुपात खरेदी करताना त्याबाबत संपूर्ण माहिती घेणे आवश्यक आहे. तरीही फसवणूक झाल्यास जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे दाद मागण्याचा हक्क ग्राहक संरक्षण कायदा २०१९ नुसार नागरिकांना मिळाला असल्याचे श्री. गिराम म्हणाले.

ग्राहकांना सजग करण्यासाठी राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त आयोजित उपक्रम उपयुक्त ठरेल. या माध्यमातून मिळणाऱ्या माहितीमुळे नागरिकांमध्ये आपल्या हक्कांबाबत जागृती निर्माण होईल, असे प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके म्हणाले.

प्रास्ताविकामध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे यांनी जागतिक ग्राहक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ग्राहक जनजागृती पंधरवडा अंतर्गत जिल्ह्यात कार्यक्रमांची माहिती दिली. तसेच २४ डिसेंबर रोजी जिल्ह्यात शाळा, महाविद्यालयात ग्राहक हक्काबाबत माहिती दिली जाणार असल्याचे सांगितले.

पोलीस निरीक्षक दयानंद पाटील यांनी सायबर सुरक्षाविषयी मार्गदर्शन केले. जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे अशासकीय सदस्य रंजना पाटील, राजेश भोसले, अभिजित औटे, दत्ता मिरकले पाटील यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्री. धायगुडे यांनी केले, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

लातूर शहर महानगरपालिका, महावितरण, अन्न व औषध प्रशासन, कृषि विभाग, आरोग्य विभाग, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय आदी विभागांमार्फत उभारण्यात आलेल्या दालनांना यावेळी मान्यवरांनी व नागरिकांनी भेटी देवून माहिती घेतली.

# शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी डिजिटल साक्षर होण्याची गरज - प्र.प्राचार्य सिद्धेश्र्वर बेल्लाळे

लातूर : शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी



डिजिटल साक्षरतेबरोबर सॉफ्ट स्किल आणि अत्याधुनिक कार्यालयीन एप्लीकेशनचा वापर करावा.कारण बदलत्या काळानुसार डिजिटल साक्षर होण्याची खरी गरज आहे,असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागातर्फे दि.१९ ते २४ डिसेंबर २०२४ दरम्यान शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी आयोजित शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये डिजिटल साक्षरता विकसित करणे ' या विषयावरील पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन झाले.मागील १० वर्षांपासून संगणकशास्त्र विभागातर्फे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी या प्रशिक्षण कार्यशाळेचे दरवर्षी आयोजन केले जाते.या प्रशिक्षण कार्यशाळेत डिजिटल साक्षरताबरोबर सॉफ्ट स्किल आणि बेसिक इंग्लिश स्पिकिंग या विषयाचेसुद्धा प्रशिक्षण देण्यात येत आहे.

याप्रसंगी संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे,संगणकशास्त्र विभाग समन्वयक डॉ.संगीता जाजू,कार्यशाळा समन्वयक प्रा.अरुणा चौधरी,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव आणि बन्सी कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रोहिणी शिंदे यांनी केले तर आभार कार्यशाळा समन्वयक प्रा.अरुणा चौधरी यांनी मानले.सूत्रसंचालन प्रा.वैभव कुलकर्णी यांनी केले.याप्रसंगी प्रा.सुजाता काळे,प्रा. कृष्णा सारडा,प्रा.सुमित जोशी,प्रा. पूजा नंदगावे,प्रा.आशा बोराडे,प्रा. दीपाली दाडगे,प्रा.साजिया फरीन, प्रा.विजय पवार,प्रा.गोविंद बांगड, प्रा.आदित्य सूर्यवंशी,प्रा.प्रतीक मुसमाडे,प्रियंका हिप्परकर,मानसी गायकवाड,राहुल बनभेरू यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# संत गाडगेबाबा स्मृती दिनानिमित्त गाडगेबाबा चौकात अभिवादन

लातूर : रोजी येथील संत गाडगेबाबा चौकात थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांच्या ६८ व्या स्मृती दिनानिमित्त संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस लातूर शहर महानगरपालिका माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार,माजी नगरसेवक आनंत गायकवाड ,लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे , सचिव बाबासाहेब बनसोडेयांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करून संत गाडगेबाबा चौक फलकाचे अनावरण करण्यात आले.



या वेळी प्रस्तविकात प्रा गिरीधर तेलंगे यांनी लातूर शहर महानगरपालिका कडून दिनांक २१/१२/२०१६ रोजीच्या ठराव क्रमांक ११६ नुसार स्क्राप मार्केट गोरक्षण मार्गे रींग रोड चौकास संत गाडगेबाबा चौक नावाचा ठराव घेऊन तसे फलक बसवण्यात आले होते नुकतेच राष्ट्रीय मार्ग यांच्या कडून बाय पास रींग रोड विकास कामात सदरील फलक काढण्यात आला होता आज संत गाडगेबाबा यांच्या स्मृती दिनानिमित्त चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते संत गाडगेबाबा नावाच्या फलकाचे अनावरण करण्यात आल्याचे सांगितले या वेळी प्रमुख पाहुणे चंद्रकांत बिराजदार यांनी आपल्या भाषणात थोर समाज सुधारक संत गाडगेबाबा यांनी माणसात देव शोधून मानवाचे शत्रू अंधश्रद्धा,

अशिक्षितपणा,व अस्वच्छते विरोधात प्रबोधन करीत स्वतः स्वच्छता अभियान राबवित समाजाला स्वछतेचे महत्व पटवून दिल्याचे सांगितले या वेळी ग्यानदेव तेलंगे, गणपतराव तेलंगे,नर्सिंग जाधव,प्रा वैजनाथ जाधव , प्रशांत सुरवसे,सुधाकर सुरवसे, कृष्णा तेलंगे,बालाजी तेलघाणे,दत्ता पवार ,धोंडिबा चवळे,गणेश पवार इत्यादि उपस्थित होते या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा गिरीधर तेलंगे,मठपती मामा,केंद्रे सर ,गणेश कवठाळे इत्यादींने प्रयत्न केले उवस्थितांचे आभार प्रदर्शन गणपराव तेलंगे यांनी मानले

# लातूर जिल्ह्यात १९ ते २४ डिसेंबर दरम्यान सुशासन सप्ताहाचे आयोजन

लातूर, : शासकीय कार्यालयात असलेल्या प्रलंबित तक्रारींचे निवारण युद्ध पातळीवर करण्यासाठी १९ ते २४ डिसेंबर २०२४ या काळात लातूर जिल्ह्यात सुशासन सप्ताह राबविण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. या अंतर्गत जिल्ह्यात 'प्रशासन गाव की ओर हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाचे उद्घाटन प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या उपस्थितीत गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झाले.

प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी प्रियांका आयरे, अहिल्या गाठाळ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रमेश जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. प्रशासनिक सुधार तथा लोक शिकायत विभाग कार्मिक, लोक शिकायत और पेंशन मंत्रालय यांच्या निर्देशानुसार हा सप्ताह राबविण्यात येत आहे. या अभियानात विविध शासकीय कार्यालयात प्रलंबित विविध तक्रारीचे निवारण युद्ध पातळीवर करण्यात येणार आहे. तसेच विविध सेवा पुरविणेबाबत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. अभियानात सहभागी होण्यासाठी नागरिकांना आपले सरकार पोर्टल, सीपीजीआरएएमएस इत्यादी पोर्टलवरील तक्रारी नोंदविता येतील. या व्यतिरिक्त महाऑनलाईन पोर्टलवर विविध सेवासाठी अर्ज करता येईल. तसेच आयोजित विशेष शिबिरामध्ये अर्ज दाखल करता येतील. या अभियानातंर्गत दाखल तक्रारी अथवा अर्ज यावर प्रथम प्राधान्याने कार्यवाही करण्यात येईल. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या अभियानात सहभाग नोंदवावा व आपली गाऱ्हाणी व विविध सेवासाठींचे अर्ज दाखल करावेत, असे आवाहन लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# 'अन्वी'त अद्ययावत ग्रंथालय व संगणक कक्षाचे उद्घाटन

लातूर : शहरातील सूतमिल कंपाउंड परिसरातील अन्वी गर्ल्स हॉस्टेलमध्ये अद्ययावत ग्रंथालय व संगणक कक्षाचे उद्घाटन आणि नीट मॅरेथॉन परीक्षेतील गुणवंत विद्यार्थिनींना जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांच्या हस्ते रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले.



अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी एन. एम. जाधव उपस्थित होते. मंचावर राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, 'अन्वी'चे संचालक प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, तुळजाभवानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, सदस्या स्वाती घुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शिक्षणाधिकारी फुटाणे म्हणाल्या, अन्वी गर्ल्स हॉस्टेल हे लातूर जिल्ह्यातील किंबहुणा मराठवाड्यातील सर्वात अत्याधुनिक हॉस्टेल आहे. या हॉस्टेलमध्ये स्विमिंग पूल, वातानुकुलीत ग्रंथालय, आवश्यक पुस्तके, उच्च शिक्षीत ग्रंथपाल, लिफ्ट, परिसरावर सीसीटीव्हीची नजर, आरोग्य सुविधा, अभ्यासातील शंकांचे निरसन करण्यासाठी प्राध्यापक वर्ग, 'एन लिट'द्वारे वाचनासाठी विविध पुस्तके व वर्तमानपत्रे, पोषक जेवण आदी सुविधा उपलब्ध आहेत. अपयशातूनच यशाचा मार्ग सापडतो. अपयश आले तरी खचून न जाता आपण कुठे कमी पडलो, याचे आत्मचिंतन करावे. भरकटायला लावणार्या घटकांपासून दूर रहा. सौंदर्याऐवजी गुणवत्तेला प्राधान्य द्या. ध्येय निश्चित करून या हॉस्टेलमध्ये असलेल्या सुविधांचा लाभ घेऊन परिश्रमाच्या जोरावर आपले व आपल्या पालकांचे स्वप्न साकार करा, असा सल्ला त्यांनी उपस्थित विद्यार्थिनींना दिला.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, गतवर्षी या हॉस्टेलमधील एका विद्यार्थिनीने नीट परीक्षेत ६९०, तर यावर्षी एका विद्यार्थिनीने ६९२ गुण मिळवून यश संपादन केले आहे. जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर यश निश्चित मिळते. ध्येय निश्चित करून ध्येयाच्या दिशेने वाटचाल करा, असे आवाहन त्यांनी केले.

प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांच्या पुढाकारातून घेण्यात आलेल्या नीट मॅरेथॉन परीक्षेतील इयत्ता ११ वीतील अनुष्का अशोक लोंढे (प्रथम), अर्पिता अमोल कोकरे (द्वितीय), समृध्दी मलिक रोकडे (तृतीय) आणि इयत्ता १२ वीतील प्रतिभा भारत पागिरे (प्रथम), आयुष्या दयानंद पनुरे (द्वितीय) आणि आर्या विष्णू भोसले (तृतीय) यांना अनुक्रमे ५ हजार, ३ हजार व २ हजार रुपये रोख, गौरवचिन्ह व शाल देऊन कुटुंबासह कौतुक करण्यात आले.

संस्थेचे समन्वयक राजीव मुंढे यांनी सूत्रसंचालन करून शेवटी आभार मानले. यावेळी शिवकांत वाडीकर, विष्णू कराड, विलास चौधरी, ज्योती नागरगोजे, मारुती गित्ते, नुसरत पटेल, राम टिळे व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# चटका लावून जाणारी निवृत्ती

भारताचा अव्वल ऑफ स्पिनर रविचंद्रन अश्विन याने ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या तिसऱ्या कसोटी नंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट मधून निवृत्तीची घोषणा केली. रविचंद्रन आश्विन याच्या निवृत्तीच्या घोषणेने क्रिकेट रसिकांना धक्का बसला कारण त्याची निवृत्ती अनपेक्षित होती. आश्विन असा काही निर्णय घेईल असे कोणालाच वाटले नव्हते कारण त्याच्यात अद्याप बरेचसे क्रिकेट शिल्लक होते. जरी तो आज ३८ वर्षाचा असला तरी तरी तो फिट आणि फॉर्मात होता.

सहा महिन्यांपूर्वीच इंग्लंड विरुद्धच्या राजकोट कसोटीत त्याने ५०० बळींचा टप्पा गाठत विक्रमी कामगिरी केली होती. कसोटी क्रिकेटमध्ये पाचशे बळी घेणारे मोजकेच गोलंदाज आहेत त्यात आश्रिवनचा समावेश झाला होता. भारताच्या दृष्टीने पाहायला गेले तर कसोटीत पाचशे बळी मिळवणारा तो भारताचा दुसराच गोलंदाज आहे. या आधी अशी कामगिरी भारताचा महान लेगस्पिनर अनिल कुंबळे यालाच करता आली आहे. आश्रिवनने ५३७ कसोटी बळी घेतले आहेत आणि त्याच्यापुढे फक्त अनिल कुंबळे होता अनिल कुंबळे याने कसोटीत ६१९ बळी घेतले आहेत याचाच अर्थ दोघांमध्ये आता फक्त ८२ बळींचे अंतर होते. आश्रिवन आता ३८ वर्षाचा आहे.

त्याचा फॉर्म आणि फिटनेस उत्तम आहे त्यामुळे तो आणखी एक दीड वर्ष सहज खेळू शकला असता. तो जर आणखी एक दीड वर्ष खेळला तर तो अनिल कुंबलेला मागे टाकून भारताकडून सर्वाधिक बळी मिळवणारा गोलंदाज ठरला असता. मात्र त्याने त्याची वाट न पाहता निवृत्ती घोषित केली त्यामुळेच त्याची निवृत्ती क्रिकेट रसिकांना चटका लावून गेली. अर्थात त्याच्या या कृतीतून त्याच्या विषयीचा आदर आणखीन वाढला. आपण विक्रमासाठी नाही तर देशासाठी खेळलो हे त्याने कृतीतून सिद्ध केले. रविचंद्रन आश्रिवन हा जगातील सर्वाधिक धोकादायक गोलंदाज समजला जात असे. विशेषतः भारतीय खेळपट्ट्यांवर तर तो अधिक धोकेदायक ठरत असे.

त्याने मिळवलेल्या ५३७ बळीपैकी ३८३ बळी त्याने भारतात घेतल्या आहेत. परदेशातही त्याची कामगिरी चांगली आहे. परदेशातही त्याने बळी मिळवलेले आहेत. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया यासारख्या बलाढ्य संघाविरुद्ध त्याने सातत्याने चांगली गोलंदाजी केली आहे. त्याने केवळ गोलंदाज म्हणून नाही तर फलंदाज म्हणूनही चांगली कामगिरी केली आहे. कसोटीत त्याने सहा शतके झळकावली आहेत. कसोटीत सहा शतके झळकावणे ते ही सातव्या, आठव्या क्रमांकावर येऊन ही साधी गोष्ट नाही. कसोटीत ५०० बळी आणि ६ शतक झळकावणारा तो एकमेव खेळाडू आहे. अशी कामगिरी एक चांगला अष्टपैलू खेळाडूच करू शकतो. आश्रिवनने हे करून आपण केवळ गोलंदाज नसून अष्टपैलू खेळाडू आहोत हे सिद्ध केले आहे.

आश्रिवनने कसोटीत ११ वेळा मालिकाविराचा पुरस्कार जिंकला आहे हा देखील एक विक्रमच आहे. मागील दशकभरात भारताने कसोटीत जे वर्चस्व गाजवले त्यामागे आश्रिवन हे एक महत्वाचे कारण आहे. आश्रिवनने केवळ कसोटीतच नाही तर एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही चमकदार कामगिरी केली. एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही त्याने खूप बळी मिळवले आहे. कसोटी प्रमाणेच एकदिवसीय आणि टी २० सामन्यातही त्याने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. आश्रिवन हा भारताचा खराखुरा मॅच विनर खेळाडू आहे. २०११ साली जेंव्हा त्याने भारताकडून कसोटीत पदार्पण केले तेंव्हा अनिल कुंबळे निवृत्त झाला होता तर हरभजन सिंगचा उतरता काळ सुरू झाला होता. या दोघांनी जवळपास दीड दशके भारतीय फिरकी गोलंदाजीची धुरा सांभाळली होती त्यांच्या नंतर भारतीय फिरकीची धुरा कोण सांभाळणार हा प्रश्न होता कारण त्यावेळी त्यांची जागा घेणारा तर सोडाच पण त्यांच्या जवळपास जाऊ शकणारा एकही फिरकी गोलंदाज दिसत नव्हता.

आश्रिवन ज्यावेळी आला त्यावेळीही तो इतकी मोठी मजल मारेल असे भाकीत कोणी केले नव्हते मात्र त्याने मिळालेल्या संधीचे सोने केले आणि भारताला अनेक अप्रतिम विजय मिळवून दिले. त्यामुळेच तो आज महान गोलंदाजांच्या पंगतीत जाऊन बसला. रविचंद्रन आश्रिवनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्यापूर्वी देशांतर्गत क्रिकेट ही गाजवून सोडले होते. त्याने रणजी सामन्यात सातत्याने बळी मिळवले मात्र त्याला खरी ओळख मिळवून दिली ती आयपीएलने. आयपीएलमध्ये आश्रिवनने चेन्नई सुपर किंग्जचे प्रतिनिधीत्व केले.

मुथय्या मुरलीधरन हा चेन्नई सुपर किंग्जचा प्रमुख गोलंदाज होता. कर्णधार महेंद्रसिंग धोनीला गोलंदाजीची सुरुवात फिरकीने करायची होती मात्र मुरलीधरन सुरुवातीलाच गोलंदाजी करण्यास तयार नसल्याने धोनीने चेंडू आश्रिवनकडे सोपविला. आश्रिवनने संधीचे सोने करीत प्रतिस्पर्धी संघाची सलामीची फळी कापून काढण्याची कामगिरी केली आणि तिथेच धोनीचा आश्रिवनवर विश्र्वास बसला. आयपीएलमध्ये सातत्याने चांगली कामगिरी केल्याने धोनीने त्याला भारताकडून खेळायची संधी दिली. आश्रिवनने धोनीने टाकलेला विश्र्वास सार्थ ठरवला आणि भारताला अनेक अविस्मरणीय विजय मिळवून दिले. कसोटीत तर त्याने करामत केली. खेळपट्टी कुठलीही असो आपल्या फिरकीने आश्रिवन त्यावर रंग भरत असे. त्याच्या बोटांमध्ये जादू होती. त्याच्याकडे शेन वॉर्न सारखे ग्लॅमर नव्हते, मुथय्या मुरलीधरन सारखी दहशत त्याच्याकडे नव्हती, कुंबळे, हरभजनसिंग सारखी लोकप्रियता देखील त्याला मिळाली नाही तरीही तो या दिग्गजांच्या पंगतीत जाऊन बसला कारण त्याची शैली वेगळी होती. त्याने कोणाचीही कॉपी केली नाही. त्याने स्वतःची वेगळी शैली विकसित केली. जगातील एक सर्वोत्तम हुशार फिरकी गोलंदाज म्हणून त्याने अल्पावधीतच ख्याती मिळवली.

कारण चेंडू बोटांनी, मनगटांनी वळत असला, तरी आधी डोक्यात तो समोरच्या फलंदाजाला कसा टाकायचा याचे चित्र तो आधीच तयार करून ठेवायचा म्हणूनच त्याच्या चेंडूचा सामना करताना भल्या भल्या फलंदाजांची भंभेरी उडायची. तो आपल्या गोलंदाजीत सतत नवनवीन प्रयोग करायचा. आर्म बॉल, कॅरम बॉलचा तो खुबीने वापर करायचा. ऑफ स्पिनर असूनही तो मध्येच लेगब्रेक आणि गुगली टाकायचा त्यामुळे फलंदाजांची दांडी गुल व्हायची. त्याने आता निवृत्ती स्वीकारल्याने त्याची ती गोलंदाजी पुन्हा पाहायला मिळणार नाही अर्थात तो आयपीएल आणि क्लब क्रिकेट खेळेल पण चार षटकांच्या क्लब क्रिकेट मधील त्याच्या गोलंदाजीला कसोटी क्रिकेट मधील गोलंदाजीची सर येणार नाही. कसोटीत त्याची उणीव नेहमीच जाणवत राहील. त्याच्या तोडीचा तर सोडाच त्याच्या जवळपास पोहचू शकेल असा कोणताच गोलंदाज आज भारतात नाही त्यामुळेच त्याच्या निवृत्तीने भारतीय क्रिकेट मध्ये मोठी पोकळी निर्माण होणार आहे. निवृत्ती नंतर रविचंद्रन आश्रिवनने त्याची ऑफ स्पिनची कला तरुण, युवा होतकरू खेळाडूंना शिकवावी आणि त्याच्यासारखे खेळाडू त्याने देशाला निर्माण करून द्यावेत हीच त्याच्याकडून क्रिकेट रसिकांची अपेक्षा आहे रविचंद्रन आश्रिवनला निवृत्ती नंतरच्या आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे,९९२२५४६२९५**

# तर हत्ती हे ठरले असते काँग्रेसचे निवडणूक चिन्ह, जाणून घ्या भाजप आणि काँग्रेसला कशी मिळाली पक्षाची चिन्हे

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी सर्व राजकीय पक्ष पूर्ण ताकदीने प्रचार करत आहेत. मोठ्या निवडणूक रॅलींमध्ये नेत्याच्या चेहऱ्यापेक्षा पक्षाचे चिन्ह जास्त ठळकपणे दिसत असते. पण असे का? मतदार मतदान करताना ईव्हीएमवर त्यांच्या नेत्याचा चेहरा न पाहता निवडणूक चिन्ह पाहतात. भारतातील राजकीय पक्षांसोबतच त्यांच्या निवडणूक चिन्हांचाही स्वत:चा मनोरंजक इतिहास आहे. आज काँग्रेस आणि भाजपने त्यांची निवडणूक चिन्हे कशी निश्चित केली, हे जाणून घेऊया.

आज काँग्रेसचे निवडणूक चिन्ह हात म्हणजेच पंजा आहे. पण १९५१ मध्ये झालेल्या देशातील पहिल्या लोकसभा निवडणुकीत त्याचे चिन्ह वेगळे होते. एकेकाळी काँग्रेसकडे निवडणूक चिन्ह बदलून हत्ती किंवा सायकल असा पर्यायही होता. काँग्रेसने निवडणूक चिन्ह म्हणून पंजा का निवडला ते जाणून घेऊया. 'कमळ'पूर्वी भाजपचे चिन्ह काय होते?

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (घ्ण) हा देशातील सर्वात जुना राजकीय पक्ष आहे. त्याची स्थापना १८८५ मध्ये झाली. १९५१-१९५२ मध्ये देशाच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या, तेव्हा जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली काँग्रेस बैलजोडी या निवडणूक चिन्हावर मते मागायची. हे चिन्ह सामान्य जनता आणि शेतकरी यांच्यात सलोखा निर्माण करण्यात यशस्वी ठरले आणि जवळपास दोन दशके काँग्रेस पक्षाने या चिन्हावर निवडणूक लढवली. पण १९७०-७१ मध्ये काँग्रेसमध्ये फूट पडली. पक्ष दोन गटात विभागला गेल्याने बैलजोडीचे चिन्ह निवडणूक आयोगाने जप्त केले.

कामराज यांच्या नेतृत्वाखालील जुन्या काँग्रेसला तिरंग्यातील चरखा आणि इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील नव्या काँग्रेस पक्षाला गाय-वासरू हे चिन्ह देऊन वाद मिटला. मात्र, दशकभरातच काँग्रेस पक्षात चिन्हावरून पुन्हा वाद निर्माण झाला.

१९७७ मध्ये आणीबाणी संपल्यानंतर इंदिरा गांधींच्या




कार्यकाळात काँग्रेसच्या लोकप्रियतेत लक्षणीय घट झाली. या काळात निवडणूक आयोगाने गाय आणि वासरू चिन्हही जप्त केले. काँग्रेस कठीण टप्प्यातून जात होती. अडचणीत असताना इंदिरा गांधी तत्कालीन शंकराचार्य स्वामी चंद्रशेखरेंद्र सरस्वती यांचे आशीर्वाद घेण्यासाठी आल्या होत्या. इंदिरा गांधींचे म्हणणे ऐकून शंकराचार्य शांत झाले, असे म्हणतात. काही वेळाने त्यांनी उजवा हात वर करून आशीर्वाद दिला. काँग्रेसच्या सध्याच्या निवडणूक चिन्हाची कहाणी इथून सुरू झाली.

१९७९ मध्ये काँग्रेसचे आणखी एक विभाजन झाल्यानंतर इंदिरा गांधींनी काँग्रेस (आय) ची स्थापना केली. निवडणूक चिन्ह अंतिम करण्यासाठी त्यांनी बुटा सिंग यांना निवडणूक आयोगाच्या कार्यालयात पाठवले. तेथे निवडणूक आयोगाने काँग्रेस (आय)चे निवडणूक चिन्ह म्हणून हत्ती, सायकल आणि मोकळ्या हाताचा पर्याय दिला. इंदिरा गांधी यांनी पक्षाचे नेते आरके राजरत्नम यांची कल्पना आणि शंकराचार्यांच्या आशीर्वादाची जाणीव ठेवून पंजा हे निवडणूक चिन्ह बनवण्याचा निर्णय घेतला.

नवीन निवडणूक चिन्हासह निवडणुकीत काँग्रेसला मोठा विजय मिळाला. हे चिन्ह पक्षासाठी शुभेच्छा मानले जात होते आणि तेव्हापासून आजतागायत काँग्रेस पक्षाचे उमेदवार याच चिन्हावर निवडणूक लढवत आहेत.

इंदिरा गांधींच्या काँग्रेसला दिलेले उरलेले दोन पर्याय नंतर मोठ्या पक्षांचे प्रतीक बनले हे विशेष. करिश्माई लोकप्रिय नेते कांशीराम यांनी १९८४ मध्ये बसपा म्हणजेच बहुजन समाज पक्षाची स्थापना केली आणि हत्तीला त्यांचे राजकीय चिन्ह बनवले. त्याच वेळी मुलायम सिंह यांनी १९९२ मध्ये समाजवादी पक्षाची स्थापना केली आणि त्यांचे निवडणूक चिन्ह म्हणून 'सायकल' निवडले.

दिवा ते कमळापर्यंतचा प्रवास

पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी भाजप हा अखिल भारतीय जनसंघ होता. जनसंघाचे निवडणूक चिन्ह जळणारा दिवा होता. त्या निवडणुकीत आणखी एक पक्ष किसान मजदूर प्रजा सोशालिस्ट पार्टी होता, ज्याचे निवडणूक चिन्ह झोपडी होते. १९७७ च्या निवडणुकीत याच झोपडी निशाण आधारित प्रजा पक्षाने दीपक चिन्हासह जनसंघ आणि चौधरी चरणसिंग यांच्या नेतृत्वाखालील भारतीय क्रांती दलात विलीन केले. या सगळ्यातून जनता पक्ष नावाचा नवा पक्ष अस्तित्वात आला आणि त्यांचे निवडणूक चिन्ह खांद्यावर नांगर घेऊन जाणारा शेतकरी. मात्र, ही संघटना फार काळ टिकू शकली नाही. १९८० मध्ये जनता पक्षाचे विघटन झाल्यानंतर तत्कालीन जनसंघाच्या नेत्यांनी भारतीय जनता पक्षाची स्थापना केली, ज्याला कमळाचे फूल हे निवडणूक चिन्ह मिळाले. चौधरी चरणसिंग यांच्या नेतृत्वाखालील लोकदलाला शेत नांगरणाऱ्या शेतकऱ्याचे निवडणूक चिन्ह मिळाले.

## राशीभविष्य २१ डिसेंबर २०२४

मेष : शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर
सामाजिक यशात थोरामोठ्यांचा सहभाग अपेक्षित राहील. काहींना नवा प्राप्तीमार्ग हाती आल्याचा आनंद होईल.

वृषभ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:दक्षिण
आर्थिकदृष्ट्या अनेक मोठे प्रश्न हातावेगळे करू शकाल. नोकरी व्यवसायात अनुकूल घटना घडतील.

मिथुन : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण
निरनिराळ्या सुचणाऱ्या कल्पना व्यावसायिकदृष्ट्या आत्ताच अंमलात आणू नका. जवळचा प्रवास करा.

कर्क : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: पश्चिम
नोकरी-व्यवसायात फार मोठा धोका पत्करणे सध्या तरी योग्य ठरणार नाही. मुलांच्या संबंधातील प्रश्न सुटतील.

सिंह : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम
एखादी महत्त्वाची पण विलंबाने झालेली कृती फायद्याची जाणवेल. काही नवीन आलेले प्रस्ताव विचाराधीन राहतील.

कन्या : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: पश्चिम
काहींना अचानक धनलाभाच्या संधी मालामाल करतील. दीर्घ सहलीचा आनंद सहकुटुंब लुटाल.

तुळ : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा : उत्तर
काही विशेष कामानिमित्त आपणास लांबच्या प्रवासाचे बेत आखावे लागतील.

वृश्चिक : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:उत्तर
वैवाहिक जीवनात वैवाहिक साथीदाराचा पूर्ण पाठिंबा आपले मनोधैर्य वाढवणारा ठरेल.

धनु : शुभ रंग: निळा, शुभ दिशा: उत्तर
आर्थिकदृष्ट्या कोणत्याही आश्वासनांवर विसंबून न राहता हाती येईल तेच खरे ही भूमिका घ्या.

मकर : शुभ रंग: लाल, शुभ दिशा: पूर्व
उद्योगधंद्यात काही व्यवहार अनपेक्षित फलदायी ठरतील. संततीच्या महत्त्वाच्या प्रश्नामध्ये निर्णायक यश मिळेल.

कुंभ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व
नोकरी-व्यवसायात मोठे लाभ होतील तसे परिचितांचा गट वाढेल. आपल्या कामात त्याचा उपयोग करून घेऊ शकाल.

मीन : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व
व्यापारी वर्गाला आपले व्यापारकौशल्य सिद्ध करता येईल. महत्त्वाचे निर्णय फायदेशीर ठरतील.

## इतिहासात आजचा दिवस २० डिसेंबर २०२४

अंतरराष्ट्रीय

१९६६- सुमारे १६०० किलो वजनाचे ल्युनोखोड हे यान दंद्रावर उतरले. या यानाने चंद्रावरील मातीच्या तपासणीचे निष्कर्ष पृथीवर पाठविले.

१९९३- अमेरिकेतील 'न्यूयॉर्क वर्ल्ड' या वृत्तपत्राम ध्ये सर्व प्रथम शब्दकोडे छापले गेले.

२००४- ब्राझिलचा रोनाल्डिन्हो या वर्षीचा सर्वोत्कृष्ट फुटबॉलपटू.

२००६- इंग्लंडचा वेगवान गोलंदाज स्टीव्ह हार्मिसन एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्त.

२००७ - दहशतवादी हल्ल्यात सहभागी असल्याच्या आरोपाखाली अनेक दिवस ऑस्ट्रेलियात बंदी बनविण्यात आलेला भारतीय डॉक्टर मोहम्मद हनीफ याने ऑस्ट्रेलिया सरकारविरूद्धची कायदेशीर लढाई जिंकली. ऑस्ट्रेलियात काम करण्याचा व्हिसा (वर्क व्हिसा) आपल्याला परत मिळावा ही त्याची मागणी न्यायालयाने योग्य असल्याचे म्हटले.

२००७ - बेल्जियमचे राजा अल्बर्ट यांनी गॉय वेरहोफ्स्टाड यांना देशाचे काळजीवाहू पंतप्रधान म्हणून नियुक्त केले.

२००८ - दक्षिण अमेरिकेच्या फ्रेंच गुयाना येथील कोरु अंतराळ केंद्राहून भारतीय बनावटीचे यूरोपीय उपग्रह 'डब्ल्यू२एम' घेऊन जात असलेल्या ५ रॉकेटचे प्रक्षेपण करण्यात आले.

राष्ट्रीय

---- - उत्तर गोलार्धातील सर्वांत छोटा दिवस व सर्वांत दीर्घ रात्र. या दिवसी सूर्य मकरवृत्तावर असतो.

१९०९- अनंत कान्हेरे व त्यांच्या साथीदारांनी नासिकच्या नाट्यगृहात क्लेक्टर जॉक्सनला गोळ्या घालून मारले.

२००४- पदक मिळविण्यासाठी चमककींचा खोटा देखावा निर्माण करणारे मेजर सुरिंदर सिंग यांना सियाचीन प्रकरणात तीन वर्षे कैद.

२००६- छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांच्या भूसुरुंग स्फोटात चार ठार.

२००६- इंफाळमध्ये बस दरीत कोसळून २२ ठार.

२००६- मुंबईच्या स्वामी विवेकानंद शाळेचा विद्यार्थी शार्दूल ठाकुरने हॅरिस शील्ड स्पर्धेच्या प्लेट डिव्हीजनम ध्ये एस.राधाकृष्णन शाळेविरुध्द एका क्रिकेट सामन्यात एका षटकात ६ षटकार ठोकले.

२००७ - अॅकॅडमी ऑफ म्युझिकच्या नकुल जोगदेव याने पुण्यात झालेल्या ऑल इंडिया पियानो स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

जन्म

१९०३- भालचंद्र दिगंबर गरवारे या गरवारे उद्योग समूहाचा पाया घालणाऱ्या उद्योजकाचा जन्म.

१९११- महराष्ट्र शुगर मिल्सचे माजी संचालत दत्तात्रेय डहाणूकर यांचा जन्म.

१९२१- भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी प्रम ुखन्यायाधीश प्रफुल्लचंद्र नटवरलाल भागवती यांचा जन्म.

१९३७- अमेरिकन अभिनेत्री व शारीरिक तंदुरुस्तीची प्रसारक जेन फौंडा हिचा जन्म.

निधन

१८२४- कंपवाताचा मानवी मेंदूशी संबंध आहे. हे सिद्ध करणाऱ्या जेम्स पार्किनस्नचा मृत्यू. त्याचे नाव या रोगाशी 'पार्किन्सन्स डिसीझ,' असे कायमचे जोडले गेले.

१९७१- निवृत्तीनाथ रावजी पाटील तथा पी. सावळाराम यांचे निधन.

२००६- तुर्कमेनिस्तानचे राष्ट्रपती सपार्मुरत नियोजोव यांचे निधन.

२००७- सुप्रसिद्ध कवी डॉ. हरिवंशराय बच्चन यांची पत्नी व महानायक अमिताभ बच्चन यांच्या आई तेजी बच्चन यांचे निधन.

## ब्लड ग्रुपनुसार कसा असला पाहिजे तुमचा डाएट चार्ट?



फीट आणि फाईन असावे, हे प्रत्येकाला वाटते. निरोगी राहण्यासाठी योग्य आहार घेतला पाहिजे, असा सल्ला नेहमी तज्ज्ञांकडून दिला जातो. मात्र निरोगी राहण्यासाठी नेमका कसा आहार घेतला पाहिजे, याची अनेकांना माहिती नसते. आता तुम्हाला पण यामध्ये तुमचा ब्लड ग्रुप मदत करू शकणार आहे. तुम्हाला माहितीये का, योग्य डाएट निवडण्यासाठी तुम्हाला तुमचा ब्लडग्रुप मदत करू शकतो. यामुळे तुम्ही फीट राहू शकता. तुमच्या रक्तगटानुसार, कसा आहार घेतला पाहिजे, हे जाणून घेऊया.

ए ब्लड ग्रुप

जर तुमचा रक्तगट ए असेल तर तुम्ही तुमच्या आहाराची अधिक काळजी घेतली पाहिजे. रक्तगट ए असलेल्या व्यक्तींची रोगप्रतिकारक शक्ती फार संवेदनशील असल्याचं मानलं जातं. त्यामुळे या व्यक्तींनी कमी चरबीयुक्त आहार घेतला पाहिजे. याशिवाय तुमच्या आहारामध्ये तांदूळ, राई, भोपळा, शेंगदाणे, सोया फूड, अक्रोड, मनुका, गहू यांचा समावेश करा. त्याचप्रमाणे ग्रीन टी पिण्यावर भर द्यावा.

एबी ब्लड ग्रुप

जर तुमचा ब्ल ग्रुप एबी असेल तर तुम्ही रेड मीट म्हणजेच लाल मांस खाणं टाळलं पाहिजे. या व्यक्तींनी मासे, मांस भाज्या, कार्ब्स, दूध, दही तसंच दुग्धजन्य पदार्थ अनुकूल ठरतात. याशिवाय अधिक प्रोटीन तुमच्यासाठी महत्त्वाचे ठरू शकतात. या गोष्टींचा आहारात समावेश करणं तुमच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकतं. मुख्य म्हणजे हा रक्तगट असलेल्या व्यक्ती मिश्र प्रकारचा आहार घेऊ शकतात.

ओ ब्लड ग्रुप

ओ रक्तगट हा फार महत्त्वाचा मानला जातोय. ज्या व्यक्तींचा ब्लड ग्रुप ओ असतो त्यांनी त्यांच्या आहारामध्ये प्रोटीनचा समावेश केला पाहिजे. यामध्ये तुम्ही आहारात मांस, अंडी, मासे यांचा समावेश करावा. याशिवाय धान्य आणि सोयाबीनसह शेंगांचं प्रमाण संतुलित ठेवलं पाहिजे. या प्रकारचा आहार घेतल्याने तुम्ही निरोगी राहण्यास मदत होईल.

बी ब्लड ग्रुप

बी रक्तगट असलेल्या लोकांनी आहारामध्ये काही पदार्थ घेणं टाळलं पाहिजे. यामध्ये प्रक्रिया केलेले पदार्थ, कोबी, कॉर्न, शेंगदाणे तसंच पॅकेज फूड खाणं बी ब्लड ग्रुप असलेल्या व्यक्तींनी टाळावं. मुळात या व्यक्ती विविध प्रकारचा पदार्थ आहारात समाविष्य करू शकतात. यामध्ये मांस, भाज्या, धान्ये यांचा समावेश आहारात करावा. याशिवाय जर या व्यक्तींनी एका दिवसभरात मांस खाल्ले असेल तर संध्याकाळी भाज्या वगैरे खाण्यावर भर दिला पाहिजे.

## उपदेशकथा, ईश्वरनिष्ठा

एक ईश्वरभक्त होता. तो व त्याचे कुटुंब सन्मार्गी होते परंतु त्याला बायको व मुलांची फार काळजी वाटे. आपली मुले सज्जन आहेत पण बाहेरचे जग तसे नाही. आपल्या मुलांना बदमाश लोक फसवतील या काळजीने तो ग्रासला होता.

एके दिवशी त्याची पत्नी त्याला म्हणाली, 'आपली मुलं इतकी गुणी आहेत व घरातही सर्व सुख असताना आपण नेहमी कसल्या चिंतेत असता?' त्यावर तो म्हणाला, 'आपली मुले गुणी व सज्जन आहेत पण या फसव्या जगात त्यांचा कसा निभाव लागणार, याची मला चिंता वाटते. त्यामुळे मला रात्री झोपही लागत नाही.' पत्नी म्हणाली, 'अहो, तुम्ही ईश्वराची भक्ती करता, शेवटपर्यंत तुम्ही अशी काळजी करत राहणार का?' तो म्हणाला, 'जेव्हा माझा मृत्यू जवळ आला आहे असे वाटेल तेव्हा मी देवाची प्रार्थना करेन की देवा, मी आता चाललो, तू अत्यंत दयाळू आहेस, माझी मुलं नीतिमान आहेत, तू त्यांचे दुष्टांपासून रक्षण कर.' हे ऐकून पत्नी म्हणाली, 'जी प्रार्थना तुम्ही शेवटी करणार, ती प्रार्थना आत्ताच करा, प्रपंचाचा सर्व भार त्या दयाळू ईश्वरावर सोपवून तुम्ही निर्भर राहा.'

कथा उपदेश : प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी झटा.

## क्रीडा सप्ताहअंतर्गत स्पर्धांमधील विजेत्यांना बक्षीस वितरण

लातूर, : क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेत क्रीडा विषयक प्रोत्साहनात्मक वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात दि. १२ ते १८ डिसेंबर या कालावधीत क्रीडा सप्ताह साजरा करण्यात आला. याअंतर्गत आयोजित क्रीडा सप्ताहानिमित्ताने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूर यांच्यामार्फत १२ ते १८ डिसेंबर, २०२४ या कालावधीत जिल्ह्यात विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजयी खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत पदके आणि प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

तसेच जिल्हा क्रीडा संकुल येथे लातूर जिल्ह्यातील कुस्ती व जिम्नॅस्टीक खेळांच्या खेळाडूंनी प्रात्यक्षीके सादर करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी खेळाडूंना खेळामध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी गुरूमंत्र दिला. याप्रसंगी नेताजी जाधव, थेलॅटीक्स कोच समाधान बुरगे, राहुल होनसांगळे, लायक सय्यद, अमजद शेख, जिम्नॅस्टीक कोच आशा झुंजे, कुस्तीकोच चेतन जावळे, तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे, धीरज बावणे, बाबासाहेब इंगोले, सागर पोतदार, प्रसाद वैद्य आदी उपस्थित होते.

कार्यक्रमप्रसंगी जिल्ह्यातील विविध खेळाच्या स्पर्धांमध्ये प्राविण्य प्राप्त केलेल्या विजयी खेळाडूंना प्रमाणपत्र व पदकांचे वाटप प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे यांनी केले तर आभार तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका क्रीडा अधिकारी सारीका काळे, सुरेंद्र कराड, राज्य क्रीडा मार्गदर्शक जयराज मुंढे, चंद्रकांत लोदगेकर, क्रीडा अधिकारी कैलास लटके, कृष्णा केंद्रे, धीरज बावणे, बाबासाहेब इंगोले, प्रवीण कांबळे, चेतन जावळे, गणेश वंगवाड, तेजस गोरे, प्रसाद वैद्य यांनी प्रयत्न केले.

## (गुरु वचन),आनंदी राहण्याचा निर्णय घ्या - सुधांशु महाराज

आनंदी राहाणे ही एक चांगली सवय आहे. पण, लोक आनंदी राहाण्यापेक्षा दु:खाची कारणे शोधण्यातच वेळ घालवतात. आनंदी राहण्यामुळे सकारात्मक ऊर्जा प्रवाहित होऊन सुख आणि समृद्धी येते. म्हणून आनंदी राहण्याचा निर्णय घ्या.

प्रसन्नतेत सौंदर्य आहे. प्रसन्नता आनंदी राहण्यामुळे येते. त्यामुळे आनंदी राहा. वेळ, शक्ती, उर्जा व योग्यतेचा उपयोग केल्यास आपली प्रगती निश्चित आहे. प्रत्येकाने आधी स्वत:ला ओळखले पहिजे. जो स्वत:ला ओळखत नाही तो स्वत:चा शत्रू असतो, असे समजा. स्वत:ला ओळखणाऱ्याची प्रगती आणि विकास होतो. सुख, समृद्धी, यश त्याच्या दाराशी येते. या उलट आळशी, निष्काळजी, विकासापासून दूर पळणाऱ्या आणि आलेली संधी गमावणाऱ्याला कधीही सुख-शांती मिळत नाही.

विद्या, शौर्य, कौशल्य, शक्ती व धैर्य हे पाच गुण तुमचे मित्र आहे. नकारात्मक विचार आणि उदासीन दृष्टिकोनामुळे हे पाचही मित्र हरवतात. आणि तुम्ही आठवण केली तेव्हा तुमच्या मदतीला धावून येतात. पण, ते हरवल्यानंतर त्यांना शोधण्यासाठी बाहेर धाव न घेता स्वत:च्या अंतरंगात शोधा. कारण हरवलेली वस्तू हरवलेल्याच ठिकाणी सापडते हे लक्षात घ्या. दिवसाची सुरुवात नामस्मरण आणि नमस्काराने करा. कारण नमस्कार भगवंतालाही आवडतो. नेहमी हसतमुख राहा. त्यामुळे तुम्ही स्वत: तर आनंदी राहताच पण, तुमच्या संपर्कात येणाऱ्यालाही आनंद देता.

## मंत्री बाबासाहेब पाटील यांचा २२ डिसेंबर रोजी लातूर जिल्हा दौरा

लातूर, : राज्याचे मंत्री बाबासाहेब पाटील हे रविवार, २२ डिसेंबर २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

मंत्री ना. पाटील यांचे २२ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता अहमदपूर तालुक्यातील सांगवी फाटा येथे आगमन होईल. त्यानंतर भक्तीस्थळ येथे राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज समाधी दर्शन घेतील. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, टिपू सुलतान स्मारक येथे त्यांचे स्वागत, सत्कार समारोह होईल. त्यानंतर स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या पुतळ्यास अभिवादन, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन, महात्मा बसवेश्र्वर चौक येथे अभिवादन करतील. हॉटेल भगीरथी समोर त्यांचे स्वागत, सत्कार होईल. त्यानंतर अहमदपूर येथील प्रसाद गार्डन येथे बालाजी विनायक पाटील यांच्या मुलीच्या विवाह प्रसंगी सदिच्छा भेट देतील. शिरूर ताजबंद येथील बालाजी मंदिर येथे दर्शन, तसेच राजकुमार प्रभाकर चव्हाण यांच्या मुलीच्या विवाह प्रसंगी सदिच्छा भेट देतील.

ना. पाटील यांचे दुपारी २.१५ वाजता शिरूर ताजबंद येथील शिवछत्रपती नगर येथे इंद्रायणी निवासस्थानी आगमन होईल व राखीव. त्यानंतर शिरूर येथील महादेव मंदिर येथे दर्शन व मंदिर व्यवस्थापन समितीमार्फत स्वागत, सत्कार समारोह कार्यक्रमाल उपस्थित राहतील. शिरूर ताजबंद येथील शिरूर मुखेड रोडवर शिवराज पाटील आंबेगावकर यांच्या आईसाहेब मेडिकल स्टोअर्स उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थित राहतील. त्यानंतर मुक्ताई हार्डवेअर उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थित राहतील. यानंतर चाकूर बसस्थानकासमोर महायुतीमार्फत आयोजित स्वागत, सत्कार समारंभाला उपस्थित राहतील. चाकूर येथील माझी माय मंगल कार्यालय येथे अरविंद शेट्टे यांच्या मुलीच्या विवाहप्रसंगी सदिच्छा भेट देतील. अहमदपूर येथे बालासाहेब पाटील आंबेगावकर यांच्या घरगुती कार्यक्रमाला सदिच्छा भेट देतील. रात्री ८.१५ वाजता शिरूर ताजबंद येथील इंद्रायणी निवासस्थान येथे आगमन व राखीव.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894